MHLA160004942017

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११४/२०१७**
**शासन वि. राहुल**

### –:: नि.क्र.१ लगत आदेश ::–

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे भारतीय दंड विधानाचे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम १३४ व १३५ च्या गुन्ह्याकरिता दि.१६/०९/२०१७ रोजी दाखल झाले. आरोपी क्र.१ ते १० यांच्यावर गैरजमानती वॉरंटची बजावणी झालेली नाही. पोलीस त्याकरिता कसूर करीत आहेत. सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. आरोपी मिळून येत नसल्याबाबत पोलीसांनी अहवाल सादर केलेले आहेत. त्याप्रमाणे भविष्यात सुध्दा आरोपीवर वॉरंटची बजावणी होण्याची शक्यता नाही. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोशमुक्त करण्यात येते.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:32:24 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – १३–०३–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**